जनमानसाचा निडर आवाज...

# पुणे प्राईम न्यूज

मुख्य संपादक : जनार्दन दांडगे

दैनिक | वर्ष १ | अंक २०५ | बुधवार, १८ फेब्रुवारी २०२६ | मूल्य : २ रु. | पाने : ४ | RNI NO - MAHMAR/2022/84210

BLUEVORA
WITH ADDED MINERALS
Pure Clean & Natural
PACKAGED DRINKING WATER

## संक्षिप्त

### गणेश नाईक यांची शिंदेंवर अप्रत्यक्ष टीका

**ठाणे, ता. १७ :** नवी मुंबईतील भूखंड वाटपाच्या प्रश्नावरून वनमंत्री गणेश नाईक यांनी पुन्हा एकदा आक्रमक भूमिका घेत उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यावर अप्रत्यक्ष टीका केली. जनतेच्या प्रश्नांवर बोलू शकलो नाही तर मंत्रिपद काय चाटायचे का? असा संतप्त सवालही त्यांनी वाशी येथील एका कार्यक्रमातून उपस्थित केला. त्यांच्या या वक्तव्याचा राजकीय अर्थ काढला जात असून उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालील नगरविकास खात्याकडे त्यांनी बोट दाखवल्याची चर्चा राजकीय वर्तुळात रंगली आहे. नवी मुंबईकरांच्या सुविधांसाठी विशेषतः रुग्णालय आणि सार्वजनिक उद्यानांसाठी काही भूखंडांची मागणी करण्यात आली होती. मात्र हे भूखंड सार्वजनिक उपयोगाऐवजी खासगी विकासकांच्या फायद्यासाठी वळवण्यात आल्याचा आरोप वनमंत्री गणेश नाईक त्यांनी केला आहे. नवी मुंबईकरांचे भूखंड बिल्डरांच्या घशात घालण्याचे काम झाले. दलालांमार्फत हे प्रकार घडले. ज्या मंत्रिमंडळात मी आहे, त्याच मंत्रिमंडळातील नगरविकास खात्याने अशी कृत्ये केली, याची मला लाज वाटते, असा संताप नाईक यांनी व्यक्त केला आहे.

# नागरिकांनी ऑफलाईन सेवेचा लाभ घ्यावा : संदीप भाजीभाकरे

## पुणे शहरात तांत्रिक अडचणीमुळे ऑनलाईन चारित्र्य पडताळणी सेवा तात्पुरती बंद

**पुणे, ता. १७ :** परदेश प्रवास, व्हिसा, खासगी-सरकारी नोकरी तसेच विविध शासकीय प्रक्रियांसाठी चारित्र्य पडताळणी दाखला आता अनिवार्य करण्यात आला आहे. त्यामुळे प्रत्येक अर्जदाराला पोलीस क्लिअरन्स सेवा घ्यावी लागत आहे. मात्र सध्या राष्ट्रीय माहिती विज्ञान केंद्र (एमआयसी) यांच्या प्रणालीत तांत्रिक अडचणी निर्माण झाल्याने ऑनलाईन चारित्र्य पडताळणी सेवा तात्पुरती बंद आहे. त्यामुळे गरजू नागरिकांना ऑफलाईन चारित्र्य पडताळणी प्रमाणपत्र दिले जात असल्याची माहिती पुणे शहर पोलीस विशेष शाखेचे पोलीस उपायुक्त संदीप भाजीभाकरे यांनी दिली.



महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान महामंडळ अंतर्गत एनआयसी सेवेमध्ये तांत्रिक समस्यांमुळे डिजिटल सिग्नेचर कॅप्चर होत नसून, परिणामी क्यूआर कोड किंवा व्हेरिफिकेशन कोड जनरेट होत नाही. त्यामुळे सध्या ऑनलाईन चारित्र्य पडताळणी प्रमाणपत्र देणे शक्य नाही. ही सेवा सुरळीत व्हावी यासाठी महाआयटीकडे सातत्याने पाठपुरावा सुरू असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले. नागरिकांची गैरसोय होऊ नये, यासाठी पोलीस प्रशासनाने सही व शिक्क्यासह ऑफलाईन चारित्र्य पडताळणी प्रमाणपत्र देण्यास सुरुवात केली आहे. ज्यांना तातडीने प्रमाणपत्राची आवश्यकता आहे, त्यांनी या ऑफलाईन सुविधेचा लाभ घ्यावा, असे आवाहन भाजीभाकरे यांनी केले आहे. पुढे बोलताना संदीप भाजीभाकरे म्हणाले की, सामान्यतः चारित्र्य पडताळणीचे प्रमाणपत्र एका महिन्यात दिले जाते. यापूर्वी ही प्रक्रिया १५ ते २० दिवसांत पूर्ण होत होती. मात्र सध्याच्या तांत्रिक अडचणींमुळे प्रमाणपत्र मिळण्यास अधिक कालावधी लागू शकतो. क्यूआर कोड किंवा ऑनलाईन व्हेरिफिकेशन अनिवार्य असणाऱ्या अर्जदारांना काही काळ प्रतीक्षा करावी लागणार आहे, कारण सध्या कोणत्याही माध्यमातून डिजिटल पडताळणी शक्य होत नाही.

दरम्यान, महा ऑनलाईन कडून ही सेवा लवकरच पूर्ववत होईल, अशी सकारात्मक माहिती मिळाली आहे. तोपर्यंत नागरिकांनी अफवांवर विश्वास न ठेवता प्रशासनास सहकार्य करावे, संयम राखावा आणि अत्यावश्यक कामांसाठी ऑफलाईन प्रमाणपत्राचा पर्याय स्वीकारावा, असे आवाहनही भाजीभाकरे यांनी केले आहे.

### ऑनलाईन सेवा कधी सुरू होणार?

गेल्या महिनाभरापासून पुणे शहरात चारित्र्य पडताळणीची ऑनलाईन सेवा पूर्णतः ठप्प आहे. त्यामुळे नोकरी, व्हिसा, शिक्षण व परदेश प्रवासाशी संबंधित हजारो अर्ज रखडले असून, या विलंबामुळे सामान्य नागरिकांना मानसिक त्रास सहन करावा लागत आहे. ऑनलाईन सेवा नेमकी कधी सुरू होणार? हा प्रश्न आता पुणेकरांचा सामूहिक आक्रोश बनला आहे.



# इंदापूरमध्ये सकल हिंदू समाजाकडून निषेध आंदोलन

**आदित्य बोराटे**

इंदापूर, ता. १७ : छत्रपती शिवाजी महाराजांची तुलना टिपू सुलतानाशी करणारे काँग्रेसचे प्रदेश अध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांच्या बेताल वक्तव्याचा इंदापुरात सकल हिंदू समाजाच्या वतीने जाहीर निषेध करून त्यांच्या फोटोची प्रतिमा जाळत जोरदार घोषणाबाजी करण्यात आली.

इंदापूर नगरपरिषदेसमोरील छत्रपती शिवाजी महाराज व डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या पुतळ्यास मंगळवारी सकाळी सकल हिंदू समाजाकडून पुष्पहार अर्पण करून शहरातील पंचायत समिती समोरील जुना पुणे -सोलापूर राष्ट्रीय महामार्गावर हे निषेध आंदोलन पार पडले. या वेळी छत्रपती शिवाजी महाराजांच्या जयजयकाराच्या घोषणा देऊन हर्षवर्धन सपकाळ मुर्दाबाद अशा विविध घोषणा पदाधिकाऱ्यांनी दिल्या.

या वेळी दीपक अण्णा काटे, ॲड. आकाश कांबळे, माऊली चवरे, राजकुमार जठार, ॲड. मयूर शिंदे, राम आसबे, उदय देशपांडे, किरण गानबोटे,महेश बोधले,सागर गोसावी,नितीन देवकर,आदींसह पदाधिकारी उपस्थित होते.

दीपक काटे म्हणाले,आमच्या दैवताचा जो अपमान हर्षवर्धन सपकाळांनी केला, त्याबद्दल आम्ही इंदापूर सकल हिंदू समाज व भारतीय जनता पार्टीच्या वतीने निषेध करत आहोत. हिंदूंची सरेआम कत्तल करणाऱ्या टिपू सुलतानाची तुलना छत्रपती शिवाजी महाराजांबरोबर करणे ही अतिशय लांछनास्पद गोष्ट आहे. औरंगजेबाच्या समाधीचे उदात्तीकरण करणाऱ्या काँग्रेसकडून यापेक्षा वेगळी अपेक्षा नाही. त्यामुळे अशा या काँग्रेसच्या प्रदेशाध्यक्षाने त्वरित राजीनामा द्यावा.यावेळी आंदोलनकर्त्यांनी हर्षवर्धन सपकाळ यांच्यावर कारवाई करण्याची मागणी केली.

# ब्लॅक बॉक्स उच्च तापमानामुळे बाधित

## अजित पवार विमान अपघाताबाबत प्रथमच अधिकृत माहिती जाहीर

**पुणे, ता. १७ :** अजित पवार यांच्या विमान अपघाताबाबत प्रथमच अधिकृत माहिती समोर आली आहे. एअरक्राफ्ट क्सिडेंट इन्वेस्टिगेशन ब्युरोने जारी केलेल्या निवेदनात अपघातग्रस्त विमानातील दोन्ही रेकॉर्डर उच्च तापमानामुळे बाधित झाल्याचे स्पष्ट केले आहे. विमान बराच वेळ आगीत जळत राहिल्याने रेकॉर्डरमधील माहितीवर परिणाम झाल्याचे सांगण्यात आले आहे.



ब्युरोच्या माहितीनुसार, विमानात फ्लाइट डेटा रेकॉर्डर आणि कॉकपिट व्हॉईस रेकॉर्डर असे दोन रेकॉर्डर होते. त्यापैकी संभाषणाशी संबंधित काही डेटा मिळवण्यात यश आले आहे. मात्र कॉकपिट व्हॉईस रेकॉर्डरवरील सखोल तांत्रिक तपास अद्याप सुरू आहे. हा रेकॉर्डर कँम्ननीनिर्मित असून संबंधित देशातील अधिकृत प्रतिनिधींची मदत मागवण्यात आली आहे.

तपास प्रक्रियेवर विश्वास ठेवावा आणि तर्क-वितर्कांना बळी पडू नये, असे आवाहन ब्युरोकडून करण्यात आले आहे. आंतरराष्ट्रीय मानकांनुसार पुरावेनिष्ठ तपास सुरू असल्याचेही स्पष्ट करण्यात आले. या प्रक्रियेत विमान वाहतूक महासंचालनालय चेही सहकार्य आहे.

ब्लॅक बॉक्समध्ये फ्लाइट डेटा रेकॉर्डर आणि कॉकपिट व्हॉईस रेकॉर्डरचा समावेश असतो. उड्डाणादरम्यान विमानातील तांत्रिक माहिती आणि वैमानिकांमधील संभाषण याची नोंद यात केली जाते. अत्यंत मजबूत बनावटीचे हे उपकरण अपघातानंतर तपासासाठी महत्त्वाचे ठरते.

दरम्यान, रोहित पवार यांनी तपासातील विलंबावर प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे. अपघाताला दिवस उलटूनही तपासाचा वेग समाधानकारक नसल्याचे त्यांनी म्हटले आहे. ब्लॅक बॉक्स खराब झाल्याच्या माहितीकडे त्यांनी संशयाने पाहत पूर्वी व्यक्त केलेली शक्यता खरी ठरत असल्याचा दावा केला. २८ जानेवारी रोजी मुंबई येथून बारामती कडे जात असताना लँडिंगदरम्यान झालेल्या अपघातात अजित पवार यांच्यासह पाच जणांचा मृत्यू झाला होता. त्यांच्या निधनाने राज्यभर शोककळा पसरली होती.

# अजितदादांचे निर्णय त्यांच्यासोबतच गेले : खासदार सुप्रिया सुळे

**पुणे, ता. १७ :** राष्ट्रवादी काँग्रेसच्या दोन्ही गटांच्या विलीनीकरणाबाबत गेल्या काही आठवड्यांपासून सुरू असलेल्या चर्चांना आता विराम मिळण्याची चिन्हे दिसत आहेत. उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या निधनानंतर या चर्चांना वेग आला होता. शरद पवार आणि अजित पवार यांच्यात विलीनीकरणासंदर्भात सकारात्मक चर्चा झाली होती, असा दावा काही नेत्यांकडून केला जात होता. मात्र आता या शक्यतांवरच प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.



राष्ट्रवादी काँग्रेसच्या शरद पवार गटाच्या नेत्या आणि खासदार सुप्रिया सुळे यांनी माध्यमांशी संवाद साधताना स्पष्ट भूमिका मांडली. अजित पवारांनी घेतलेले निर्णय त्यांच्यासोबतच गेले आहेत. आता माझा भाऊ नाही, त्यामुळे विलिनीकरणाच्या चर्चांना काहीच अर्थ उरत नाही, असे स्पष्ट शब्दांत सांगत त्यांनी दोन्ही गट एकत्र येण्याच्या चर्चांना पूर्णविराम दिला. त्यांच्या या वक्तव्यानंतर विलीनीकरणाच्या चर्चांना मोठा धक्का बसल्याचे मानले जात आहे.

दरम्यान, पुण्यातील गाजलेल्या मुंढवा भूखंड प्रकरणावरूनही सुळे यांनी सावध प्रतिक्रिया दिली. विकास खारगे समितीच्या अहवालात पार्थ पवार यांना दिलासा मिळाल्याची चर्चा आहे. मात्र महसूल विभागाचा अहवाल अधिकृतपणे प्रसिद्ध झालेला नाही. तो प्रत्यक्ष वाचल्याशिवाय केवळ सूत्रांच्या आधारे भाष्य करणे योग्य ठरणार नाही, असे त्यांनी स्पष्ट केले.

या प्रकरणावर बोलताना त्यांनी कौटुंबिक संवादाचाही उल्लेख केला. जेव्हा पार्थचे नाव प्रथम समोर आले, तेव्हा मी स्वतः त्याच्याशी संवाद साधला होता. त्याने मला मी काहीही चुकीचे केलेले नाही असे स्पष्ट सांगितले. मी माझ्या पुतण्याच्या शब्दांवर विश्वास ठेवला, असे सुळे म्हणाल्या.

# पेट्रोल डीलर्सच्या अडचणी सोडविण्यासाठी कामगार मंत्री ॲड. आकाश फुंडकर यांची सकारात्मक भूमिका

**पुणे, ता. १७ :** पेट्रोलियम व्यवसाय व कामगार विभागाशी संबंधित विविध प्रलंबित व ज्वलंत प्रश्न तसेच प्रशासकीय अडथळे सोडविण्याबाबत महाराष्ट्र शासनाचे कामगार मंत्री ॲड. आकाश फुंडकर यांनी सकारात्मक प्रतिसाद दिला आहे, अशी माहिती पुणे पेट्रोल डीलर्स असोसिएशनचे अध्यक्ष ध्रुव रुपारेल यांनी दिली.

मुंबई येथील मंत्रालय, मुंबई येथे मंगळवारी (ता. १७) असोसिएशनच्या पदाधिकाऱ्यांनी कामगार मंत्री ॲड. आकाश फुंडकर यांची भेट घेतली. यावेळी पेट्रोलियम व्यवसायाशी निगडित विविध अडचणी, कामगार विषयक प्रश्न तसेच प्रशासकीय अडथळ्यांवर सविस्तर चर्चा करण्यात आली.



या बैठकीस असोसिएशनचे उपाध्यक्ष विजय लांडे, धनंजय शितोळे, आबा वाल्हेकर, अमर रेणुसे, क्षितिज कांकरीया व भाग्येंद्रसिंह चूडासमा उपस्थित होते. प्रतिनिधींनी व्यवसायाशी संबंधित प्रत्यक्ष अडचणी मांडत शासन स्तरावर तातडीने उपाययोजना करण्याची मागणी केली.

दरम्यान, कामगार मंत्री ॲड. आकाश फुंडकर यांनी सर्व मुद्दे गांभीर्याने ऐकून घेत सकारात्मक भूमिका दर्शवली असून संबंधित विभागांना तत्काळ सूचना देत आवश्यक ती कार्यवाही करण्याचे आश्वासन दिले. या बैठकीनंतर पुणे जिल्ह्यातील पेट्रोल व्यावसायिकांमध्ये आशेचे वातावरण निर्माण झाले आहे.

# यापुढे कोणत्याही पक्षाच्या कार्यालया-समोर आंदोलनास परवानगी नाही

## पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांचे आदेश

**पुणे, ता. १७ :** काँग्रेस भवन परिसरात झालेल्या आंदोलनानंतर यापुढील काळात विविध राजकीय पक्षांचे नेत, तसेच पक्ष कार्यालयांसमोर आंदोलन करण्यास परवानगी दिली जाणार नाही, असे पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांनी स्पष्ट केले.

काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी छत्रपती शिवाजी महाराज यांच्यविषयी अवमानकारक वक्तव्य केल्याच्या निषेधार्थ भारतीय जनता पक्षाच्या कार्यकर्त्यांनी रविवारी काँग्रेस भवनासमोर आंदोलन केले. सपकाळ यांनी केलेल्या वक्तव्याच्या निषेध केला. या वेळी भारतीय जनता पक्ष आणि काँग्रेसच्या कार्यकर्त्यांमध्ये झटापट झाली. दोन्ही बाजूंच्या कार्यकर्त्यांनी दगडफेक केली.

या घटनेत काँग्रेसचे तीन, तसेच भाजपचे दोन असे पाच कार्यकर्ते किरकोळ जखमी झाले. दोन पोलीस कर्मचारी, दोन पत्रकार किरकोळ जखमी झाले. याप्रकरणी भारतीय जनता पक्ष, काँग्रेस कार्यकर्त्यांनी परस्परविरोधी फिर्यादी शिवाजीनगर पोलीस ठाण्यात दाखल केल्या. त्यानुसार भाजपचे शहराध्यक्ष नगरसेवक धीरज घाटे, काँग्रेसचे शहराध्यक्ष नगरसेवक अरविंद शिंदे यांच्यासह कार्यकर्त्यांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला.

काँग्रेस भवन परिसरातील आंदोलन शांतपणे पार पडेल, असा अंदाज होता. घोषणाबाजी केली जाईल, अशी शक्यता होती. आंदोलनस्थळी पोलिसांनी बंदोबस्तही तैनात केला होता. मात्र, कार्यकर्त्यांची झटापट झाली.

दगडफेक करण्यत आल्याची घटना घडली. या घटनेमुळे कायदा आणि सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झाला. पोलिसांनी त्वरीत परिस्थिती नियंत्रणात आणली. मात्र, यापुढील काळात कोणताही पक्ष, संघटनेच्या कार्यकर्त्यांना राजकीय पक्षाचे कार्यालय किंवा राजकीय पक्षाच्या नेत्यांच्या निवासस्थानासमोर आंदोलन करण्यास परवानगी दिली जाणार नाही, असे पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांनी सांगितले.

### जबाबदारी निश्चित करुन कारवाई

काँग्रेस भवन परिसरात भाजपच्या नगरसेविका महापौर मंजुषा नागपुरे उपस्थित होत्या. त्यांच्याविरुद्ध गुन्हा का दाखल झाला नाही, असा प्रश्न उपस्थित करण्यात आला. पोलिसांकडे आलेल्या तक्रारीचे अवलोकन केले जाईल. तपासातील माहितीनुसार जबाबदारी निश्चित करुन पुढील कायदेशीर कारवाई केली जाईल, असे पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांनी नमूद केले.

### पोलीस आयुक्तांनी आरोप फेटाळले

पोलिसांच्या कारवाईवर काँग्रेस पदाधिकाऱ्यांनी प्रश्न उपस्थित करुन आरोप केले. पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांनी आरोप फेटाळून लावले. पोलिसांनी कायद्यानुसार कारवाई केली असून, आरोपांमध्ये तथ्य नाही, असे त्यांनी सांगितले.

पुणे प्राईम न्यूज — जनमानसाचा निडर आवाज...
http://www.puneprimenews.com

## संक्षिप्त

### माळेगाव येथे विनयभंग करणाऱ्या प्राध्यापकावर पोक्सो अंतर्गत गुन्हा दाखल

**बारामती, ता. १७ :** शिक्षकाने अल्पवयीन विद्यार्थिनीवर लैंगिक छळ केल्याची धक्कादायक घटना बारामती तालुक्यातील माळेगाव येथे उघडकीस आली आहे. 'अंतर्गत परीक्षेचे गुण माझ्या हातात आहेत' अशी धमकी देत एका प्राध्यापकाने विद्यार्थिनीला अश्लील मेसेज पाठवून तिच्यावर दबाव टाकल्याचा प्रकार समोर आला आहे. या घटनेमुळे शैक्षणिक वर्तुळात मोठी खळबळ उडाली असून पालकांमध्ये प्रचंड संतापाची लाट आहे. मिळालेल्या माहितीनुसार, माळेगाव येथील एका इंजिनिअरिंग कॉलेजमध्ये डिप्लोमाच्या प्रथम वर्षात शिकणाऱ्या एका १७ वर्षीय मुलीला आरोपी प्राध्यापक नितीन शंकर तावरे याने लक्ष केले. २२ जानेवारी ते १२ फेब्रुवारी २०२६ या कालावधीत हा छळ सुरू होता. हा प्राध्यापक वर्गात शिकवताना विद्यार्थिनींना चुकीच्या पद्धतीने स्पर्श करणे आणि त्यांच्याशी जवळीक साधण्याचा प्रयत्न करणे, अशा तक्रारीही समोर आल्या आहेत. विद्यार्थिनीने जेव्हा या प्रकाराला विरोध केला किंवा मेसेजला उत्तर देण्याचे टाळले, तेव्हा आरोपीने आपल्या पदाचा गैरवापर केला. अंतर्गत परीक्षेचे ३० गुण माझ्या हातात आहेत, अशी उघड धमकी देऊन त्याने विद्यार्थिनीला मानसिक दडपणाखाली ठेवले. वर्गात मुलींचा अपमान करणे आणि त्यांना कमी लेखणे हा या विकृत शिक्षकाचा जणू नित्यक्रमच बनला होता. अखेर पीडित तरुणीने अखेर घडलेला प्रकार घरी सांगितला असता त्यांनी अखेर तक्रार दाखल केली.

### बारामतीत मानसिक छळाला कंटाळून २३ वर्षीय तरुणाची आत्महत्या

**बारामती, ता. १७ :** बारामती तालुक्यातील रुई बयाजीनगर येथील ही घटना असल्याचे समोर आले आहे. प्रेम प्रकरणातून त्याने हे टोकाचे पाऊल उचलल्याचे समोर आले आहे. १५ फेब्रुवारीच्या सायंकाळी विक्रमने घरातच गळफास घेतला. त्याने चिठ्ठी लिहिले कि, आई मला माफ कर... मला ब्लॅकमेल करून खूप मानसिक त्रास दिला जात आहे, दरम्यान, या प्रकरणी तरुणी आणि तिच्या पालकांविरोधात गंभीर स्वरूपाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. विक्रम आणि संबंधित तरुणीमध्ये गेल्या पाच वर्षांपासून प्रेमसंबंध होते. लग्नाचे आश्वासन देऊन दोघ ५ वर्षांपासून प्रेमसंबंधात होते. तरुणीच्या घरच्यांचा विरोध सुरू झाला आणि इथूनच छळाचा सिलसिला सुरू झाला. आरोप असा आहे की, केवळ लग्नाला नकारच दिला गेला नाही, तर विक्रमचा मानसिक छळ केला गेला. २७ डिसेंबर २०२५ पासून त्याला वारंवार फोन करून धमकावणे, त्याचे खासगी फोटो आणि चॅटिंग जबरदस्तीने डिलीट करण्यास भाग पाडणे, असे प्रकार घडले. दरम्यान, छळाला कंटाळून तरुणाने आत्महत्या केली. याप्रकरणीघरच्या तरुणी आणि तिच्या पालकांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास सुरु आहे.

### लष्कर भागात टोळक्याकडून पिता-पुत्राला बेदम मारहाण

**पुणे, ता. १७ :** लष्कर भागात टोळक्याकडून पिता-पुत्राला बेदम मारहाण केल्याची घटना घडली. टोळक्याने त्यांच्यावर तीक्ष्ण शस्त्राने वार केले. या प्रकरणी एकाला अटक करण्यात आली असून, साथीदारांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला. या प्रकरणी अल्हान साजीद खान याला अटक करण्यात आली आहे. टोळक्याने केलेल्या मारहाणीत अथर्व अमोल बिल्लमपल्ली (वय २४, रा. कामाठीपुरा, लष्कर), त्याचे वडील अमोल हे जखमी झाले आहेत. त्यांच्यावर रुग्णालयात उपचार सुरू आहेत. याबाबत अथर्व याने लष्कर पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, महाशिवरात्रीच्या दिवशी लष्कर भागात फराळ वाटपाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. फराळ वाटपानंतर रात्री साडेनऊच्या सुमारास अमोल आणि त्याचे वडील रिक्षातून केटरिंग व्यावसायिकाकडून घेतलेले टेबल परत देण्यासाठी निघाले होते. आरोपी खान आणि साथीदार हे दुचाकीवरुन निघाले होते. दुचाकी पुढे नेण्याच्या कारणावरुन त्यांच्यात किरकोळ वाद झाला. त्यानंतर खान आणि साथीदारांनी रिक्षा अडवून बिल्लमपल्ली पिता-पुत्राला मारहाण करण्यास सुरुवात केली. त्यांच्यावर तीक्ष्ण शस्त्राने वार केले. टोळक्याने केलेल्या मारहाणीत ते जखमी झाले. त्यानंतर आरोपी पसार झाले. पसार झालेल्या खान याला अटक करण्यात आली असून, सहायक पोलीस निरीक्षक दांडगे तपास करत आहेत.

### चिखली येथे शंभर रुपयांच्या वादातून बाप-लेकावर चाकूने वार

**पिंपरी, ता. १७ :** चिखली परिसरात केवळ शंभर रुपयांच्या देवाणघेवाणीवरून झालेल्या वादात एका तरुणाने वडील आणि मुलावर घरगुती चाकूने वार करून त्यांना जखमी केले. ही घटना सोमवारी (ता. १६) दुपारी तीन वाजण्याच्या सुमारास जाधववाडी येथे घडली. याबाबत २० वर्षीय तरुणाने चिखली पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. पोलिसांनी एका विरोधात गुन्हा दाखल केला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, फिर्यादी आणि त्यांचे वडील हे घरी बसले असताना आरोपी तिथे आला. शंभर रुपये घेतल्याच्या कारणावरून त्याने वाद घालून फिर्यादीच्या मानेवर आणि पाठीवर चाकूने वार केले. फिर्यादीचे वडील भांडण सोडवण्यासाठी मध्यस्थी करण्यास आले असता आरोपीने त्यांच्याही डाव्या गालावर चाकूने वार करून त्यांना गंभीर जखमी केले. चिखली पोलीस तपास करत आहेत.

# लोणी काळभोर येथील पालखी तळावर विशिष्ट समाजाचे अतिक्रमण?

## चौकशी करून त्वरित कारवाई करावी -शिवसेना जिल्हा संघटक निलेश काळभोर यांची मागणी

> पालखी तळाच्या जागेची देखभाल व दुरुस्तीचे काम कदमवाकवस्ती ग्रामपंचायतीकडे दिले आहे. या अतिक्रमणाबाबत अद्याप कोणतीही माहिती मिळालेली नाही. तरीही या बाबत माहिती घेऊन चौकशी करते.
> - **तृप्ती कोलते,** (अपर तहसीलदार- लोणी काळभोर तहसील कार्यालय)

**लोणी काळभोर, ता. १७ :** कदमवाकवस्ती (ता. हवेली) येथील संतश्रेष्ठ जगतगुरू संत तुकाराम महाराज पालखी तळावर एका विशिष्ट समाजातील नागरिकांनी खुलेआम अतिक्रमण करून वास्तव्य केल्याची गंभीर बाब समोर आली आहे. मागील पंधरा दिवसांपासून या ठिकाणी संशयास्पद हालचाली सुरू असतानाही प्रशासनाने साधी विचारपूसही केली नाही. या प्रकरणी शिवसेना (शिंदे गट) पुणे जिल्हा संघटक निलेश काळभोर यांनी प्रशासनावर जोरदार टीका करत तात्काळ चौकशी व कडक कारवाईची मागणी केली आहे.



पुढे बोलताना निलेश काळभोर म्हणाले की, पालखी तळासारख्या पवित्र आणि ऐतिहासिक स्थळी बेकायदेशीरपणे लोक वास्तव्यास असताना प्रशासन पूर्णपणे गाफील राहणे हे अत्यंत धक्कादायक आहे. हे नागरिक नेमकेकोठून आले? त्यांच्या जवळ वैध ओळखपत्रे आहेत की नाहीत? त्यांची पार्श्वभूमी काय आहे? याची कसून चौकशी झाली पाहिजे. अन्यथा भविष्यात स्थानिक नागरिकांच्या सुरक्षेला धोका निर्माण होण्याची शक्यता नाकारता येणार नाही, असा थेट इशाराही त्यांनी दिला. इतकेच नव्हे, तर या लोकांना येथे आश्रय कोणी दिला, कोणाच्या परवानगीने हे अतिक्रमण झाले, याचीही सखोल चौकशी करून संबंधित दोषींवर कठोर कारवाई करावी. प्रशासनाला नागरिकांच्या सुरक्षेशी काही देणेघेणे आहे की नाही? एखादी मोठी घटना घडल्यानंतरच जाग येणार का? असा थेट सवालही काळभोर यांनी उपस्थित केला आहे.

दरम्यान, लोणी काळभोर परिसरात प्रशासनाच्या निष्क्रियतेविरोधात तीव्र प्रतिक्रिया उमटू लागल्या असून, लवकरात लवकर अतिक्रमण हटवून दोषींवर कारवाई न झाल्यास शिवसेनेच्या वतीने आंदोलन घेडण्यात येणार आहे. असा इशारा निलेश काळभोर यांनी दिला आहे.

### नागरिकांच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर..

स्थानिक नागरिकांमध्येही भीतीचे वातावरण निर्माण झाले असून पालखी तळावर वाढणाऱ्या गर्दीमुळे परिसरातील महिलावर्ग आणि ज्येष्ठ नागरिकांमध्ये अस्वस्थता पसरली आहे. मात्र तरीही प्रशासनाकडून कुठलीही ठोस पावले उचलली जात नाहीत. नागरिकांच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर असताना प्रशासनाने डोळ्यावर पट्टी बांधल्याचा आरोप होत असून, आता प्रशासनाकडून पुढील पावले काय उचलली जातात? याकडे संपूर्ण जिल्ह्याचे लक्ष लागले आहे.

# बनेश्वर परिसरात महाशिवरात्रीच्या यात्रेत दोन गटांत हाणामारी; परस्परांविरुद्ध गुन्हे दाखल

**विशाल शिंदे**


नसरापूर, ता. १७ : महा शिवरात्रीच्या पार्श्वभूमीवर श्रीक्षेत्र बनेश्वर येथे मोठ्या प्रमाणात भाविकांची गर्दी असताना दोन गटांमध्ये झालेल्या वादाचे रूपांतर मारहाणीत झाले. या घटनेत दोन्ही बाजूंचे काही जण जखमी झाले असून, परस्परांविरुद्ध राजगड पोलीस ठाण्यात क्रॉस गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. रविवारी (ता. १५) पाऊणे दहा वाजण्याच्या सुमारास बनेश्वर मंदिराजवळील रस्त्याच्या कडेला लावण्यात आलेल्या मनोरंजन स्टॉल परिसरात ही घटना घडली. यात्रेच्या गर्दीत घडलेल्या या प्रकारामुळे काही काळ परिसरात तणावपूर्ण वातावरण निर्माण झाले होते.

पोलीसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, विजय बापुराव सपकाळ (वय-३०, रा. बाजारवाडी, ता. भोर) हे लहान मुलांसाठी मनोरंजन स्टॉल चालवत असताना फंडाच्या पैशांच्या कारणावरून पूर्वी झालेल्या वादाचा राग मनात धरून काही जणांनी तेथे येत वाद घातल्याचा आरोप फिर्यादीने केला आहे.

तक्रारीनुसार, संबंधितांनी बेकायदेशीर जमाव जमवून सपकाळ यांना हाताने व काठीने मारहाण केली, शिवीगाळ व दमदाटी केली. भांडण सोडविण्यासाठी आलेल्या त्यांच्या नातेवाईकांनाही मारहाण करण्यात आल्याचे नमूद आहे. यावेळी सपकाळ यांच्या आजीच्या हातातील काठी हिसकावून पाठीवर व कंबरेवर मारहाण करण्यात आल्याचा आरोप असून, या घटनेत फिर्यादी व त्यांच्या आजीला दुखापत झाली. तसेच स्टॉलची तोडफोड करून नुकसान केल्याचीही तक्रार देण्यात आली आहे. दरम्यान, याच घटनेप्रकरणी अनिकेत चंद्रकांत जाधव (वय-२५, रा. बाजारवाडी) यांनीही स्वतंत्र फिर्याद दाखल केली आहे. त्यांच्या म्हणण्यानुसार, रात्री उशिरा बनेश्वर मंदिर कमानीजवळील जानकीराम मंगल कार्यालय परिसरात फंडाच्या पैशांवरून विचारणा करण्यासाठी गेल्यानंतर दुसऱ्या गटाकडून वाद घालण्यात आला. त्यानंतर लाकडी बांबूने डोक्यावर मारहाण करून दुखापत केली तसेच लाथाबुक्क्यांनी मारहाण, शिवीगाळ व जीवे मारण्याची धमकी देण्यात आल्याचा आरोप त्यांनी केला आहे. यावेळी त्यांच्या दुचाकीचीही तोडफोड करून नुकसान केल्याचे तक्रारीत नमूद आहे. दोन्ही बाजूंच्या तक्रारींवरून भारतीय न्याय संहितेच्या विविध कलमांनुसार राजगड पोलीस ठाण्यात स्वतंत्र गुन्हे नोंदविण्यात आले आहेत. महाशिवरात्रीच्या दिवशी मोठी गर्दी असताना घडलेल्या या घटनेमुळे काही काळ यात्रेतील वातावरण ढवळून निघाले होते. प्रकरणाचा पुढील तपास पोलीस हवालदारांकडून सुरू असून, घटनेतील सर्व संबंधितांची चौकशी करण्यात येत आहे. तसेच साक्षीदारांचे जबाब व परिसरातील सीसीटीव्ही फुटेजचीही तपासणी केली जात असल्याची माहिती पोलीस सूत्रांनी दिली. पोलीसांनी नागरिकांना शांतता राखण्याचे व अफवांवर विश्वास न ठेवण्याचे आवाहन केले आहे.

# कोरेगाव पार्क परिसरातील खारगे समितीच्या अहवालाने चित्र पालटलं

## १८०० कोटींची जमीन, ३०० कोटींना?



**पुणे, ता. १७ :** पुणे शहरातील कोरेगावपार्कपरिसरातीलकोट्यवधींच्या महार वतन जमीन व्यवहाराने राज्याच्या राजकारणात मोठे वादळ निर्माण केले होते. सुमारे १८०० कोटी रुपये बाजार मूल्य असलेली जमीन अवघ्या ३०० कोटी रुपयांत विकली गेल्याचा आरोप झाल्याने खळबळ उडाली होती. सरकारी नियमांचे उल्लंघन झाल्याच्या तक्रारीनंतर या प्रकरणाचा तपास करण्यासाठी नियुक्त विकास खारगे समितीने आपला अहवाल महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्याकडे सादर केला आहे.

या अहवालामुळे पार्थ पवार यांना मोठा दिलासा मिळाल्याचे स्पष्ट झाले आहे. समितीच्या निष्कर्षानुसार, त्यांच्या विरोधात कोणतेही ठोस पुरावे आढळले नसल्याचे नमूद करण्यात आले आहे. त्यामुळे या प्रकरणात त्यांच्यावर असलेले आरोप सध्या तरी निष्प्रभ ठरले आहेत. दरम्यान, महार वतन जमीन विक्रीसाठी सरकारची विशेष परवानगी आणि कायदेशीर प्रक्रिया आवश्यक असताना ती योग्य पद्धतीने न पाळल्याचा ठपका दोन वरिष्ठ सनदी अधिकाऱ्यांवर ठेवण्यात आला आहे. व्यवहार मार्गी लावण्यासाठी पदाचा गैरवापर केल्याचे निरीक्षण समितीने नोंदवले असून संबंधित अधिकाऱ्यांवर प्रशासकीय कारवाईची शिफारस करण्यात आली आहे.

# इंदापूरच्या ऊस आंदोलनातील राजू शेट्टी, सदाभाऊ खोतांसह २१ आंदोलक निर्दोष मुक्त

**आदित्य बोराटे**

इंदापूर, ता. १७ : २०१२ साली उसदरवाढीवरून पेटलेल्या इंदापूरच्या ऊस आंदोलनात आज महत्त्वपूर्ण निकाल लागला. माजी खासदार राजू शेट्टी, माजी मंत्री सदाभाऊ खोत, सतीश काकडे, निलेश देवकर यांच्यासह २१ आंदोलकांवर दाखल केलेल्या गुन्ह्यांपैकी तीन प्रकरणांतून त्यांची निर्दोष मुक्तता करण्यात आली.



२०१२ मध्ये शेतकऱ्यांनी प्रतिटन २७०० रुपये पहिली उचल जाहीर करण्याची मागणी करत तीव्र आंदोलन छेडले होते. राज्यातील बहुतेक साखर कारखानदारांनी दर जाहीर न केल्याने आंदोलन वाढले. तत्कालीन सहकारमंत्री हर्षवर्धन पाटील यांनी तोडगा काढण्यासाठी शेतकऱ्यांसह कर्मयोगी सहकारी साखर कारखाना येथे धरणे आंदोलनाला पाठिंबा दिला.

सोलापूर-पुणे महामार्ग वर रास्ता रोको आंदोलनादरम्यान कुंडलिक कोकाटे या तरुण शेतकऱ्याचा मृत्यू झाला. त्यानंतर शेकडो शेतकऱ्यांना अटक झाली. आठवडाभर आंदोलनानंतर राजारामबापू सहकारी साखर कारखाना यांनी २५०० रुपयांची पहिली उचल जाहीर करून उसदराच्या कोंडीला तोड दिली.

राज्यभर आंदोलनामुळे शेतकऱ्यांना प्रतिटन सुमारे ३०० रुपये जास्त दर मिळाले. प्रकरणाची सुनावणी इंदापूर प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी एम. एच. फारूकी यांच्या न्यायालयात पार पडली, ज्यामध्ये ॲड. एन. जे. शहा, ॲड. महेश ढुके आणि ॲड. श्रीकांत करे यांनी विनामूल्य संरक्षण केले. या निकालामुळे आंदोलनातील नेत्यांना मोठा दिलासा मिळाला असून शेतकरी संघटनांकडून समाधान व्यक्त केले जात आहे.

# भोसरी एमआयडीसी परिसरातील जुन्या वादातून दोन गटात हाणामारी

**पिंपरी, ता. १७ :** भोसरी एम आयडीसी परिसरातील खंडेवस्ती येथे जुन्या वादातून दोन गटात हाणामारी झाली. दोन्ही गटातील आरोपींनी एकमेकांना मारहाण करून जखमी केले. ही घटना रविवारी (ता. १५) रात्री अकरा वाजण्याच्या सुमारास बुद्ध विहारासमोर घडली. याप्रकरणी परस्पराविरोधात गुन्हे दाखल केले असून सहा जणांना अटक करण्यात आली आहे.

पहिल्या प्रकरणात रघुनाथ जिंबक आव्हाड (५२, खंडेवस्ती, भोसरी) यांनी एमआयडीसी भोसरी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यानुसार राहुल उर्फ काळ्या रमेश प्रसाद (२४, खंडेवस्ती, भोसरी) याला अटक केली आहे. त्याच्यासह आठ जणांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आले आहेत. त्यातील अल्पवयीन असलेल्या तिघांना समजपत्र देण्यात आले आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, फिर्यादी रस्त्याने जात असताना आरोपींनी त्यांना घेराव घातला आणि तुझे या भागात अति चालले आहे, तुला आता ठार करतो असे म्हणून लोखंडी पट्टीने डोक्यात वार केले. फिर्यादीचा आवाज ऐकून त्यांचे नातेवाईक वाचवण्यासाठी आले असता आरोपींनी त्यांनाही लाथा-बुक्क्यांनी आणि लोखंडी पट्टीने मारहाण करून जखमी केले. या हल्ल्यात फिर्यादीसह त्यांचे नातेवाईक गंभीर जखमी झाले असून राहुल उर्फ काळ्या याला अटक करण्यात आली आहे, तर अल्पवयीन मुलांना समजपत्र देण्यात आले आहे.

याच्या परस्पर विरोधात सोनु बाबुलाल गौतम (१७, खंडेवस्ती, भोसरी) याने एमआयडीसी भोसरी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यानुसार रघुनाथ त्रिंबक आव्हाड (५०, खंडेवस्ती, भोसरी), समाधान दुधभाते (२५, खंडेवस्ती, भोसरी), ओमकार दुधभाते (२२, खंडेवस्ती, भोसरी), अविनाश दत्ता काकडे (२०, खंडेवस्ती, भोसरी) आणि एक महिला (४५, खंडेवस्ती, भोसरी) यांना अटक करण्यात आली आहे.

दुसऱ्या घटनेत पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, आरोपींनी फिर्यादी, त्यांच्या मित्राला जुन्या भांडणाच्या कारणावरून लाथा-बुक्क्यांनी मारहाण केली. त्यानंतर तुम्हाला सगळ्यांना जिवंत ठेवणार नाही अशी धमकी देऊन आरोपींनी फिर्यादीच्या डोक्यात दगडाने मारले, तर महिला आरोपीने लोखंडी पाईपने मारहाण करून गंभीर दुखापत केली. या प्रकरणी पाचही आरोपींना पोलिसांनी अटक केली आहे. एमआयडीसी भोसरी पोलीस तपास करत आहेत.

# आंबेगावातील सराईत गुन्हेगार पवन थोरातवर एमपीडीएअंतर्गत कारवाई

## अमरावती कारागृहात केले स्थानबद्ध

**मंचर, ता. १६ :** मंचर पोलीस ठाण्याच्या हद्दीत दहशत माजवणाऱ्या सराईत गुन्हेगारावर एमपीडीए कायद्यान्वये कडक कारवाई करीत त्याला अमरावती मध्यवर्ती कारागृहात स्थानबद्ध करण्यात आले आहे. पवन सुधीर थोरात (वय-२६, रा. जुना चांडोली रोड, मंचर, ता. आंबेगाव) असे कारवाई करण्यात आलेल्या सराईत गुन्हेगाराचे नाव आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, पवन थोरात याच्यावर मंचर पोलीस स्टेशन हद्दीत बेकायदेशीर जमाव जमवून मारहाण, विनयभंग, संघटित गुन्हेगारीतून बेकायदेशीर अग्निशस्त्रांचा वापर, खून व खुनाचा प्रयत्न, अल्पवयीन मुलांसह गुन्ह्यांचा कट, जाळपोळ, तोडफोड, दमदाटी यांसारख्या गंभीर प्रकारांचा समावेश आहे. भारतीय दंड विधान, भारतीय न्याय संहिता २०२३ तसेच भारतीय शस्त्र अधिनियम १९५९ अंतर्गत



याच्याविरुद्ध एकूण ८ गंभीर गुन्हे दाखल असल्याचे निष्पन्न झाले.

सराईत व धोकादायक प्रवृत्तीमुळे त्याच्याविरुद्ध एमपीडीएअंतर्गत कारवाईचा प्रस्ताव मंचरचे पोलीस निरीक्षक श्रीकांत कंकाळ यांनी पोलीस अधीक्षकांकडे सादर केला. प्रस्तावाची छाननी करून तो पुढील मंजुरीसाठी जिल्हाधिकारी यांच्याकडे पाठविण्यात आला. त्यानंतर जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी जितेंद्र डुडी यांनी सार्वजनिक सुव्यवस्थेला बाधा होऊ नये म्हणून थोरात यास स्थानबद्ध करण्याचा आदेश गुरुवारी (ता. १२) पारित केला. आदेशानुसार रविवारी (ता. १५) मंचर पोलिसांनी स्वतंत्र पथके तयार करून शोधमोहीम राबवली आणि थोरात याला ताब्यात घेत अमरावती येथील मध्यवर्ती कारागृहात दाखल केले.

सदरची कामगिरीवरिष्ठांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक अविनाश शिळीमकर, मंचर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्रीकांत कंकाळ, सहायक पोलीस निरीक्षक सुनिल बडगुजर, सहायक फौजदार महेश बनकर, पोलीस हवालदार गणेश धनवे, अतुल डेरे, संजय नाडेकर, पोलीस अंमलदार योगेश रोडे, अजित पवार, अविनाश दळवी मंचर पोलीस स्टेशन यांनी केलेली आहे.

# बारामतीला मिळणार अपर जिल्हाधिकारी, तर चाकणला अपर तहसील कार्यालय

**पुणे, ता. १७ :** जिल्ह्यात जमीनविषयक दावे दाखल होण्याचे प्रमाण वाढल्याने दाव्यांची सुनावणी एकाच अधिकाऱ्याकडे होत असल्याने दावे निकाली निघण्याचे प्रमाणही कमी आहे. त्यामुळे निर्णयास दोन ते तीन वर्षे लागतात. या पार्श्वभूमीवर पुणे जिल्ह्यासाठी नव्याने आणखी एक अपर जिल्हाधिकारी कार्यालय निर्माण करण्यास मान्यता दिली आहे.




त्यानुसार बारामती येथे अपर जिल्हाधिकारी कार्यालय स्थापन केले जाणार आहे, तर खेड तालुक्यात महसूल विभागात वाढलेले कामकाज पाहता चाकण येथे अपर तहसील कार्यालय स्थापण्यास शासनाने सकारात्मकता दर्शविली आहे. पुणे जिल्ह्यात नागरीकरण, औद्योगीकरण वेगाने होत असल्याने प्रशासनाकडील कामकाजसुद्धा वाढले आहे.

जिल्ह्यात १३ तालुके असून, भौगोलिक विस्तारही मोठा आहे. त्यामुळे ग्रामीण भागातील नागरिकांना त्यांच्या कामासाठी थेट जिल्हाधिकारी कार्यालय गाठावे लागते. त्यामुळे या दाव्यांच्या निकालासाठी वेळ लागत असल्याने आणखी एक अपर जिल्हाधिकारी पद स्थापन करण्यास शासनाने नुकतीच मान्यता दिली आहे.

### या तालुक्यांच्या समावेशाची शक्यता

बारामती अपर जिल्हाधिकारी कार्यालयांतर्गत बारामती, इंदापूर, दौंड आणि पुरंदर या तालुक्यांचा समावेश होण्याची शक्यता वर्तविण्यात येत आहे.

### चाकण येथे अपर तहसील कार्यालय

ज्याप्रमाणे हवेली तालुक्यात तीन अपर तहसील कर्यालय आहेत. त्याच धर्तीवर खेड तालुक्यात आणखी एक अपर तहसील कार्यालय स्थापन करण्याबाबत शासन सकरात्मक आहे. चाकण येथे हे कार्यालय होणार असून, त्याअंतर्गत खेड तालुक्यातील निम्मी गावे या कार्यालयाशी जोडली जाण्याची शक्यता आहे.

जमिनीचे अकृषिक परवाने, जमीनविषयक दाव्यांची सुनावणी, गौणखनिज, पुर्नवसन विभाग, कुळकायदा शाखा आदी विभाग हे अतिरिक्त जिल्हाधिकाऱ्यांकडे आहेत. या कामकाजाव्यतिरिक्त सातबारा संगणकीकरण, जिल्हा दौरा, विविध समित्यांच्या बैठका आदींमुळे जमीनविषयक दाव्यांवर वेळेत निर्णय होत नाही. त्यामुळे बारामती येथे अपर जिल्हाधिकारी कार्यालय स्थापन करण्यास मान्यता दिली आहे.

# यवत येथील कुदळे वस्ती–खुटवड वस्ती रस्त्याची दुरवस्था

## नागरिकांची तात्काळ दुरुस्तीची मागणी

**राहुलकुमार अवचट**

यवत, ता. १७ : यवत गावाच्या हद्दीतील कुद्दळेवस्तीखुटवड वस्ती कडे जाणाऱ्या रस्त्याची मोठ्या प्रमाणात दुरवस्था झाली असून नागरिकांना या मार्गावरून ये-जा करताना मोठी कसरत करावी लागत आहे. वार्ड क्रमांक ५ मधील खडकवासला कालव्याशेजारी असलेला हा रस्ता परिसरातील नागरिकांसाठी महत्त्वाचा दळणवळणाचा मार्ग आहे.

सदर रस्ता मध्ये जिल्हा परिषद पुणे यांच्या माध्यमातून दुरुस्त करण्यात आला होता. मात्र त्यानंतर नव्याने गटार लाईन टाकण्यासाठी रस्ता खोदण्यात आला. गटारचे काम पूर्ण होऊनही रस्ता पूर्ववत करण्यात आलेला नाही. परिणामी रस्त्यावर मोठे खड्डे पडले असून काही ठिकाणी गटारीची चेंबर वर



आलेली आहेत.

या परिस्थितीमुळे वाहन चालकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. दुचाकी व चारचाकी वाहनांचे नुकसान होत असल्याच्या तक्रारी नागरिकांकडून करण्यात येत आहेत.

पावसाळ्यात तर या रस्त्याची अवस्था अधिक बिकट होत असल्याचे स्थानिकांचे म्हणणे आहे. रस्त्याची तात्काळ दुरुस्ती करून नागरिकांना दिलासा द्यावा, अशी मागणी ग्रामस्थांनी केली आहे.

दरम्यान, माजी जिल्हा परिषद सदस्य गणेश कदम यांनी सांगितले की, २०१७ मध्ये जिल्हा परिषदेमार्फत रस्ता करण्यात आला होता. मात्र गटार लाईनच्या कामामुळे काही ठिकाणी रस्ता खराब झाला आहे. सदर रस्ता दुरुस्तीसाठी संबंधित विभागाकडे पाठपुरावा सुरू आहे.

# बारामतीत दिवंगत अजित पवार यांचा दहा फुट पूर्णाकृती पुतळा उभारणार

## नटराज मंडळाचा मोठा निर्णय

**बारामती, ता. १७ :** बारामतीच्या राजकारणात आणि विकासाच्या वाटचालीत ठसा उमटवणारे दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार लवकरच शहराच्या मध्यवर्ती ठिकाणी पूर्णाकृती पुतळ्याच्या रूपाने उभे राहणार आहेत. त्यांच्या कार्याला अभिवादन म्हणून १० फुट उंचीचा ब्राँझ धातूतील पुतळा उभारण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

या उपक्रमासाठी नटराज नाट्य कला मंडळ यांनी पुढाकार घेतला आहे. बारामतीकरांच्या भावना आणि दादा यांच्याशी असलेले जिव्हाळ्याचे नाते जपण्यासाठी हा उपक्रम राबविण्यात येत असल्याचे मंडळाच्या



पदाधिकाऱ्यांनी सांगितले.

शहरातील प्रमुख ठिकाण असलेल्या तिरंगा चौक येथे हा पुतळा उभारण्याचे निश्चित करण्यात आले आहे. पुतळा पूर्णाकृती असून फुट उंच असेल. ब्राँझ धातूचा वापर केल्यामुळे पुतळ्याला दीर्घायुष्य लाभेल आणि हवामानातील बदलांचा परिणाम कमी होईल, अशी माहिती देण्यात आली. वास्तवदर्शी आणि प्रभावी रचना साकारण्यासाठी तज्ज्ञ शिल्पकारांची मदत घेतली जाणार आहे.

अजित पवार यांच्या कार्यशैलीतील वेग, निर्णयक्षम नेतृत्व आणि बारामतीच्या विकासासाठी घेतलेले पुढाकार यामुळे ते शहराच्या ओळखीचा अविभाज्य भाग बनले होते. औद्योगिक प्रकल्प, पायाभूत सुविधा, शैक्षणिक संस्थांचा विस्तार आणि जलसंधारणाच्या योजनांमुळे बारामती राज्याच्या नकाशावर ठळकपणे दिसू लागली होती.


दरम्यान, त्यांच्या निधनाच्या दिवशी अल्पसंख्याक विकास विभागातून काही संस्थांना अल्पसंख्याक शैक्षणिक संस्थेचा दर्जा देण्यात आल्याने वाद निर्माण झाला आहे. युवक काँग्रेसचे सरचिटणीस अक्षय जैन यांनी दुपारी वाजता प्रमाणपत्र जारी झाल्याचा आरोप केला आहे. कार्यालयीन वेळेनंतरही प्रमाणपत्र देण्यात आल्याची शंका त्यांनी उपस्थित केली. मात्र संबंधित विभागाने तांत्रिक अडचणींमुळे प्रलंबित कागदपत्रे योगायोगाने त्याच दिवशी पूर्ण झाल्याचा दावा केला आहे.

एका बाजूला पुतळ्याच्या माध्यमातून दादांची स्मृती जपण्याचा प्रयत्न होत असताना, दुसऱ्या बाजूला त्यांच्या कार्यकाळातील काही निर्णयांवर प्रश्न उपस्थित होत असल्याने बारामतीच्या राजकारणात पुन्हा एकदा चर्चा रंगू लागली आहे.

# बारामतीत तरुणीचे अपहरण व मारहाण प्रकरणी आरोपीला अटक; येरवडा कारागृहात रवानगी

**बारामती, ता. १७ :** बारामती शहर पोलीस ठाण्याच्या हद्दीतील देशमुख चौक परिसरात एका तरुणीचा रस्ता अडवून तिचे अपहरण व मारहाण केल्याप्रकरणी आरोपीला अटक करण्यात आली असून त्याची रवानगी थेट येरवडा केंद्रीय कारागृहात करण्यात आली आहे. ओंकार अशोक जाधव (रा. हरिकृपानगर, ता. बारामती) असे येरवडा कारागृहात रवानगी करण्यात आलेल्या आरोपीचे नाव आहे. अशी माहिती बारामती शहर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्रीशैल चिवडशेट्टी यांनी दिली.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, शनिवारी (ता. १४) सायंकाळी आरोपी ओंकार जाधव याने संबंधित तरुणीची दुचाकी



जबरदस्तीने थांबवून तिच्या वाहनाची चावी हिसकावली. त्यानंतर तिला इच्छेविरुद्ध स्वतःच्या घरी नेऊन मारहाण केली, जीवे मारण्याची धमकी दिली तसेच तिच्या सन्मानास धक्का पोहोचविणारे कृत्य केल्याचा आरोप आहे.

घटनेची माहिती मिळताच बारामती शहर पोलीस स्टेशन यांनी तत्काळ गुन्हा दाखल करून आरोपीला अटक केली. न्यायालयासमोर हजर केल्यानंतर प्रथम पोलीस कोठडी मंजूर झाली. पुढील सुनावणीत न्यायालयीन कोठडी सुनावण्यात आली असून आरोपीस येरवडा केंद्रीय कारागृह येथे दाखल करण्यात आले आहे. या प्रकरणी भारतीय न्याय संहिता २०२३ अंतर्गत स्त्रीच्या लज्जेस धक्का पोहोचविणे, अपहरण, मारहाण व जीवे मारण्याची धमकी देणे अशा गंभीर कलमान्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

महिलांविरुद्ध कोणत्याही प्रकारचा गुन्हा सहन केला जाणार नाही, असा स्पष्ट संदेश देत पोलिसांनी नागरिकांना आवाहन केले आहे की, कोणताही त्रास किंवा गुन्हा घडल्यास त्वरित पोलिसांशी संपर्क साधावा. असे आवाहन बारामती शहर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्रीशैल चिवडशेट्टी यांनी दिली.

ही कारवाई पोलीस अधीक्षक संदीप गिल, अपर पोलीस अधीक्षक गणेश बिरादार, उपविभागीय पोलीस अधिकारी डॉ. सुदर्शन राठोड तसेच प्रभारी पोलीस निरीक्षक श्रीशैल चिवडशेट्टी यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस हवालदार उदय टापरे यांनी पार पाडली.

# सुनेत्रा पवार राष्ट्रवादीच्या नव्या राष्ट्रीय अध्यक्ष? बैठकीत मोठा निर्णय

**बारामती, ता. १७ :** राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात (अजित पवार गट) एक महत्त्वपूर्ण नेतृत्व बदल घडत आहे. उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांना पक्षाच्या राष्ट्रीय अध्यक्षपदावर नेमण्याची प्रक्रिया अंतिम टप्प्यात पोहोचली आहे. पक्षाचे राष्ट्रीय कार्यकारी अध्यक्ष प्रफुल्ल पटेल यांनी एका महत्त्वपूर्ण बैठकीत सुनेत्रा पवार यांच्या नावाची राष्ट्रीय अध्यक्ष म्हणून घोषणा केली असून, विश्वसनीय सूत्रांच्या माहितीनुसार ही घोषणा देवगिरी येथे पार पडलेल्या बैठकीत करण्यात आली आहे.

या बैठकीत प्रफुल्ल पटेल यांनी सुनेत्रा पवार यांचे नाव अधिकृतपणे पुढे आणल्यानंतर उपस्थित सर्व आमदारांनी हात वर करून एकमताने त्यांच्या नावाला समर्थन



दिले. पक्षातील प्रमुख नेते आणि आमदारांनी सुनेत्रा पवार यांच्या नेतृत्वाला पूर्ण पाठिंबा दर्शवला, ज्यामुळे पक्षातील एकजूट आणि स्थिरता स्पष्टपणे दिसून आली.

सध्या फक्त औपचारिक प्रक्रिया बाकी असून, येत्या २६ फेब्रुवारी २०२६ रोजी राष्ट्रवादी काँग्रेसच्या राष्ट्रीय कार्यकारिणीची बैठक बोलावण्यात आली आहे. या बैठकीत सुनेत्रा पवार यांच्या नावाची राष्ट्रीय अध्यक्षपदासाठी अधिकृत निवड आणि घोषणा होईल, अशी माहिती सूत्रांकडून समोर आली आहे. प्रफुल्ल पटेल यांनी यापूर्वीच स्पष्ट केले होते की, सुनेत्रा पवार या पदासाठी एकमेव उमेदवार आहेत आणि पक्षातील सर्व स्तरांवर याबाबत पूर्ण सहमती आहे.

पार्श्वभूमी आणि राजकीय संदर्भ अजित पवार यांच्या अकाली निधनानंतर राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये नेतृत्वाची मोठी पोकळी निर्माण झाली होती. सुनेत्रा पवार यांनी लगेचच उपमुख्यमंत्रीपदाची शपथ घेतली आणि आता राष्ट्रीय अध्यक्षपदाची जबाबदारी स्वीकारण्यासाठी तयार आहेत. हा बदल पक्षाला नवीन दिशा देऊ शकतो. सुनेत्रा पवार यांच्या नेतृत्वाखाली पक्ष अधिक मजबूत होईल आणि महिला नेतृत्वाला प्रोत्साहन मिळेल, अशी अपेक्षा पक्षातील नेत्यांकडून व्यक्त केली जात आहे.




Printed & Published By Janardan Gowardhan Dandge on behalf of Pune Prime News Network and printed at SHREE SAMARTH PRINTERS, 686, SHIVGANGA CHAMBERS, SHOP NO. G1, BUDHWAR PETH PUNE, 411002, Maharashtra. and publishded at Shop no 201, Sunrise Complex, Pune-Solapur Road. loni kalbhor(station), Tal.: Haveli Dist.: Pune-412201 Maharashtra) Editor- Janardhan Dandge (Mo. No. 9922232222).

मुद्रक, प्रकाशक व संपादक : जनार्दन गोवर्धन दांडगे. हे दैनिक पुणे प्राईम न्यूज नेटवर्क करीता मुद्रक आणि प्रकाशक जनार्दन गोवर्धन दांडगे यांनी श्री स्वामी समर्थ प्रिंटर्स, ६८६, शिवगंगा चेंबर्स, शॉप नं. जी १, बुधवार पेठ, पुणे - ४११००२ महाराष्ट्र येथे मुद्रित केले व पुणे प्राईम न्यूज नेटवर्क, शॉप नं २०१, सनराईज कॉम्प्लेक्स, पुणे सोलापूर रोड, लोणी काळभोर (स्टेशन), ता. हवेली, जि. पुणे- ४१२२०१ येथे प्रकाशित केले. 'पुणे प्राईम न्यूज' मधील लेखांचे हक्क राखून ठेवले आहेत. पुणे प्राईम न्यूज हे 'पुणे प्राईम न्यूज नेटवर्क'चे व्यापारचिन्ह आहे. (पीआरबी कायद्यानुसार जबाबदारी), दूरध्वनी : ९९२२२३२२२२, E Mail: puneprimenewsgmail.com.

पुणे प्राईम न्यूज



# गावठी पिस्तूल व जिवंत काडतूस बाळगणाऱ्या तरुणाला अटक

## बार्शी पोलिसांची धडक कारवाई



**बार्शी, दि. १७ :** बार्शी शहर पोलीस ठाण्याच्या हद्दीत अवैधरित्या गावठी बनावटीचे पिस्तूल व जिवंत काडतूस बाळगणाऱ्या एका युवकाला गुन्हे प्रकटीकरण पथकाने ताब्यात घेतले आहे. हि कारवाई राणी लक्ष्मीबाई उद्यान परिसर, सोलापूर रोड येथे करण्यात आली.

रोहित संतोष मारकड (वय २१, रा. उपळाई (रमाळा), ता. कळंब, जि. धाराशिव, सध्या रा. चोरमोले प्लॉट, बार्शी) असे अटक करण्यात आलेल्या आरोपीचे नाव आहे. त्याच्याकडून एक गावठी बनावटीचे पिस्तूल (मॅगझीनसह) आणि एक जिवंत काडतूस जप्त करण्यात आले आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, शहर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक बालाजी कुक्कडे यांच्या मार्गदर्शनाखाली गोपनीय माहितीच्या आधारे गुन्हे प्रकटीकरण पथकाचे प्रमुख पोलीस उपनिरीक्षक उमाकांत कुंजीर त्यांच्या पथकाला एका गुप्त बातमीदाराकडून माहिती मिळाली होती की, सोलापूर रोड परिसरातील राणी लक्ष्मीबाई उद्यान परिसरात आरोपी रोहित मारकड याच्याकडे गावठी बनावटीचे पिस्तूल आहे.

सदरची माहिती मिळताच पोलीस उपनिरीक्षक उमाकांत कुंजीर व त्यांच्या पथकाने सापळा रचून आरोपी रोहित मारकड यास ताब्यात घेतले. पंचासमक्ष अंगझडतीदरम्यान त्याच्या ताब्यातून एक गावठी बनावटीचे पिस्तूल (मॅगझीनसह) आणि एक जिवंत काडतूस विनापरवाना बेकायदेशीररीत्या आढळून आले. त्यानुसार मारकड याच्यावर बार्शी शहर पोलीस ठाण्यात भारतीय शस्त्र अधिनियम कलम ३ (२५) तसेच महाराष्ट्र पोलीस अधिनियम कलम १३५ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक उमाकांत कुंजीर करत आहेत.

ही कारवाई वरिष्ठांच्या मार्गदर्शनाखाली बार्शी शहर पोलीस ठाणेचे गुन्हे प्रकटीकरण पथकाचे प्रमुख पोलीस उपनिरीक्षक उमाकांत कुंजीर, पोलीस हवालदार प्रविण साठे, अमोल माने, सचिन देशमुख, अंकुश जाधव, अजीज शेख, पोलीस शिपाई बाळकृष्ण मुठाळ, अविनाश पवार, राहुल उदार, सचिन नितनात, इसाभिया बहिरे, सतीश उघडे, वैभव भांगे यांनी केली.

**नागरिकांना आवाहन**

अवैध शस्त्रे व संशयास्पद हालचाली आढळल्यास त्वरित जवळच्या पोलीस ठाण्यात किंवा ११२ या आपत्कालीन क्रमांकावर माहिती द्यावी. माहिती देणाऱ्याची ओळख गोपनीय ठेवली जाईल. शहराच्या सुरक्षेसाठी पोलीसांना सहकार्य करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

## भाजपातील दोन गटांत टोकाचे वाद

**चंद्रपूर, ता. १७ :** काँग्रेसचा गड म्हणून ओळखल्या जाणाऱ्या चंद्रपूर महापालिकेत भाजपाने ठाकरे गटाच्या मदतीने सत्तास्थापन केली. यानंतर महापौरपदी संगीता खांडेकर यांची मतदानाद्वारे निवड करण्यात आली. यादरम्यान भाजपाच्या दोन गटांत टोकाचे वाद होत असल्याचे समोर आले आहे. माजी मंत्री सुधीर मुनगंटीवार व आमदार किशोर जोरगेवार यांच्यातील वादामुळे पक्षातील कार्यकर्त्यांमध्ये नाराजीचा सूर उमटत आहे. भाजपाच्या निष्ठावान पदाधिकाऱ्यांनी आमदार जोरगेवार यांच्या कोणत्याही कार्यक्रमाला जायचे नाही आणि त्यांना निमंत्रितही करायचे नाही, असा निर्णय घेतला आहे. मुनगंटीवार व जोरगेवार यांच्यात चित्रफितींच्या माध्यमातून सोशल मिडिया वॉर रंगल्याने त्यांचे पदाधिकारी व कार्यकर्तेही एकमेकांशी भांडताना दिसून येत आहेत. या भांडणामुळे जिल्ह्यात पक्षाची प्रतिमा मलीन होत असल्याचा आरोप भाजपाच्या काही निष्ठावंत कार्यकर्त्यांनी केला आहे.

**प्राईम लाईफ**



## उन्हाळ्यात 'पित्त' वाढतंय? मग आहारात करा हे ५ महत्त्वाचे बदल

**पुणे, ता. १७ :** उन्हाळ्याचा कडाका वाढला की, शरीरातील उष्णता वाढते आणि याचा थेट परिणाम आपल्या पचनसंस्थेवर होतो. अनेकांना या दिवसांत पित्त, छातीत जळजळ आणि डोकेदुखीचा त्रास जाणवू लागतो. आयुर्वेदानुसार, उन्हाळ्यात शरीरातील 'पित्त दोष' वाढतो, त्यामुळे या काळात औषधांपेक्षा 'आहार' हीच मोठी मात्रा ठरू शकते.

पित्ताचा त्रास कमी करण्यासाठी असा असावा आहार

१. नैसर्गिक थंड पेयांना प्राधान्य द्या: पित्त शमवण्यासाठी कोकम सरबत, ताक, वाळा सरबत आणि शहाळ्याचे पाणी हे सर्वोत्तम पर्याय आहेत. ताकामध्ये चिमूटभर जिरे पूड आणि सैंधव मीठ टाकून प्यायल्याने पोटातील जळजळ त्वरित कमी होते.

२. फळांची निवड महत्त्वाची: उन्हाळ्यात आंबट फळे खाणे टाळावे. त्याऐवजी कलिंगड, टरबूज, गोड द्राक्षे, डाळिंब आणि केळी यांसारखी गारवा देणारी फळे खावीत. पिकलेला आंबा मर्यादित प्रमाणात आणि पाण्यात भिजवून ठेवावा, जेणेकरून त्याची उष्णता कमी होईल.

३. तिखट आणि तेलकट पदार्थांना 'नो': जर तुम्हाला पित्ताचा त्रास असेल, तर मसालेदार पदार्थ, जास्त तिखट रस्सा भाजी आणि तळलेले पदार्थ पूर्णपणे टाळा. हे पदार्थ शरीरात अग्नी वाढवतात, ज्यामुळे पित्ताचा भडका उडतो.

४. पालेभाज्या आणि हलका आहार: जेवणात दूधी भोपळा, पडवळ, कारले आणि कोबी यांसारख्या पाण्याचे प्रमाण जास्त असलेल्या भाज्यांचा समावेश करा. रात्रीचे जेवण हलकेआणि झोपण्यापूर्वी किमान  तास आधी असावे.

५. साजूक तुपाचा वापर: आयुर्वेदात पित्तावर साजूक तूप हे रामबाण उपाय मानले जाते. दररोज सकाळी कोमट पाण्यात किंवा जेवणात एक चमचा गायीचे साजूक तूप घेतल्याने पित्त शांत राहण्यास मदत होते.

# श्रीलंकेचा ८ गडी राखून दणदणीत विजय पथुम निस्सांकाचे ऐतिहासिक शतक




**श्रीलंका, ता. १७ :** विश्वचषक २०२६ च्या  व्या सामन्यात यजमान श्रीलंकेने निस्सांकाच्या शतकाच्या जोरावर ऑस्ट्रेलियाचा ८ गडी राखून धुव्वा उडवला. या दणदणीत विजयासह श्रीलंकेने ग्रुप बी मधून सुपर-८फेरीसाठी आपली पात्रता निश्चित केली आहे. दुसरीकडे, झिम्बाब्वेकडून पराभूत झाल्यानंतर आता श्रीलंकेनेही पराभूत केल्यामुळे ऑस्ट्रेलियावर स्पर्धेतून बाहेर पडण्याची नामुष्की ओढवली आहे.

सलामीवीर पथुम निस्सांकाने १८२ धावांच्या आव्हानाचा पाठलाग करताना ऑस्ट्रेलियन गोलंदाजीची पिसे काढली. त्याने अवघ्या ५२ चेंडूत १० चौकार आणि ५ षटकारांच्या मदतीने नाबाद १०० धावांची खेळी केली. हे या विश्वचषकातील पहिले शतक ठरले आहे. निस्सांकाला कुसल मेंडिसने ५१ धावांची साथ दिली, तर पवन रत्नायाकेने १५ चेंडूत नाबाद २८ धावा करत १८ व्या षटकातच विजय सुकर केला. घरच्या मैदानावरील श्रीलंकेचा हा टी-२० आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधील आतापर्यंतचा सर्वात मोठा धावांचा यशस्वी पाठला ठरला आहे.


तत्पूर्वी, प्रथम फलंदाजी करणाऱ्या ऑस्ट्रेलियाची सुरुवात अत्यंत वादळी झाली होती. सलामीवीर ट्रॅव्हिस हेड (५६) आणि कर्णधार मिचेल मार्श (५४) यांनी केवळ ५१ चेंडूत १०४धावांची सलामी दिली होती. एका वेळी ऑस्ट्रेलिया २०० धावांचा टप्पा ओलांडेल असे वाटत होते. मात्र, १०४ धावांवर पहिली विकेट पडताच त्यांचा डाव पत्त्याच्या बंगल्यासारखा कोसळला. श्रीलंकेच्या दुशान हेमंताने भेदक मारा करत २७ धावांत ३ विकेट्स घेतले आणि ऑस्ट्रेलियाला २० षटकांत ७ बाद १८१ धावांवर रोखले. मॅक्सवेल आणि इंग्लिस यांनी मधल्या फळीत प्रयत्न केले खरे, पण त्यांना मोठी धावसंख्या उभारता आली नाही.

**ऑस्ट्रेलियाचे अस्तित्व झिम्बाब्वेवर अवलंबून**

या पराभवामुळे ऑस्ट्रेलियाचे भवितव्य आता धोक्यात आले आहे. त्यांना त्यांचा शेवटचा सामना मोठ्या फरकाने जिंकावाच लागेल, शिवाय झिम्बाब्वेने त्यांचे उर्वरित दोन्ही सामने हरावेत अशी प्रार्थना करावी लागणार आहे. श्रीलंकेसाठी मात्र हा विजय ऐतिहासिक ठरला असून पथुम निस्सांकाच्या शतकाची सर्वत्र चर्चा रंगली आहे.

## अहिल्यानगर येथे मुलानेच केला आईचा निर्घृण खून

**अहिल्यानगर, ता. १७ :** शहरातील सावेडी उपनगरात घडलेल्या एका भीषण घटनेने संपूर्ण परिसर सुन्न झाला आहे. नवलेनगर, गुलमोहर रस्ता परिसरात पोटच्या मुलानेच आईचा निर्घृण खून केल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. या प्रकारामुळे नागरिकांमध्ये संताप आणि भीतीचे वातावरण पसरले आहे. मृत महिला बेबी गवारे या आपल्या मुलगा सुहास गवारे उर्फ मामा याच्यासोबत राहत होत्या. प्राथमिक माहितीनुसार, घरगुती कारणावरून दोघांमध्ये वाद झाला. सुरुवातीला किरकोळ असलेला वाद काही क्षणांतच हिंसक वळणावर गेला. संतापाच्या भरात सुहासने आईला मारहाण करत भिंतीवर आपटले. त्यानंतर कात्री आणि अडकित्याने वार करून तिचा खून केल्याचे तपासात समोर आले आहे. या अमानुष घटनेने परिसरातील नागरिक हादरले आहेत. घटनेनंतर आरोपीने स्वतःला घरात कोंडून घेतले. माहिती मिळताच तोफखाना पोलीस ठाण्याचे पथक घटनास्थळी दाखल झाले. पोलिसांनी दरवाजा उघडून सुहासला ताब्यात घेतले असून, बेबी गवारे यांचा मृतदेह उत्तरीय तपासणीसाठी जिल्हा रुग्णालयात पाठवण्यात आला आहे. शेजाऱ्यांच्या माहितीनुसार, बेबी गवारे या शांत आणि साध्या स्वभावाच्या होत्या. मुलाकडूनच अशी क्रूर घटना घडल्याने नागरिकांनी तीव्र हळहळ व्यक्त केली आहे. दरम्यान, या प्रकरणी खुनाचा गुन्हा दाखल करण्यात आला असून आरोपीची सखोल चौकशी सुरू आहे. खुनामागील नेमके कारण, आरोपीची मानसिक अवस्था आणि संपूर्ण घटनाक्रमाचा तपास पोलीस करत आहेत. घरगुती वादातून इतक्या टोकाची हिंसा घडल्याने कौटुंबिक तणाव आणि मानसिक आरोग्याचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे.



## चिकनच्या दुकानातच कर्मचाऱ्याचीआत्महत्या

लोणी काळभोर, ता. १७ : पुणे सोलापूर महामार्गालगत असलेल्या एका चिकनच्या दुकानातच कामगाराने आत्महत्या केल्याची धक्कादायक घटना घडली आहे. ही घटना कदमवाकवस्ती (ता. हवेली) ग्रामपंचायत हद्दीतील लोणी स्टेशन परिसरात घडली असून, सोमवारी (ता.१६) सायंकाळी सहा वाजण्याच्या सुमारास उघडकीस आली आहे.

विराजुल हायातुल्ला शेख (वय-२५, मूळ रा. पश्चिम बंगाल) असे आत्महत्या केलेल्या तरुणाचे नाव आहे. याप्रकरणी सौरभ काळभोर (वय-२७, रा. बाजार मळा, लोणी काळभोर, ता. हवेली)यांनी लोणी काळभोर पोलीस ठाण्यात खबर दिली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, विराजुल शेख हा पुणे पोल्ट्री चिकन सेंटरमध्ये काम करीत होता. शेख हा दुकानातच वायरच्या सहाय्याने गळफास घेऊन लटकलेल्या अवस्थेत अचानक आढळून आला. या घटनेची माहिती त्वरित लोणी काळभोर पोलिसांना देण्यात आली. या घटनेची माहिती मिळताच, लोणी काळभोर पोलीस त्वरित घटनास्थळी दाखल झाले.

पोलिसांनी नागरिकांच्या मदतीने तातडीने विराजुल शेख याला लोणी काळभोर येथील एका बड्या रुग्णालयात उपचारासाठी दाखल केले. परंतु, शेख याचा उपचारापूर्वीच मृत्यू झाल्याचे तेथील डॉक्टरांनी सायंकाळी सात वाजता घोषित केले. दरम्यान, लोणी काळभोर पोलिसांनी शेख याचा मृतदेह ताब्यात घेऊन शवविच्छेदन करण्यासाठी पुण्यात पाठविला आहे. शवविच्छेदनाचा अहवाल आल्यानंतर विराजुल शेख याच्या मृत्यूचे खरे कारण पुढे येईल. तरीही विराजुल शेख याने आत्महत्या का केली? त्या दृष्टीने पुढील तपास लोणी काळभोर पोलीस करत आहेत.

# शिवाजी चौकातील जबरी चोरीचा गुन्हा उघडकीस; मुख्य आरोपी ताब्यात



**बारामती, ता. १७ :** बारामती येथील शिवाजी चौकातील जबरी चोरीचा गुन्हा शहर पोलिसांनी उघडकीस आणला असून याप्रकरणी पोलिसांनी मुख्य आरोपीला अटक केली आहे.

सिद्धार्थ संतोष घाडगे (वय-३१, रा. सटवाजी नगर, इंदापूर चौक, ता. बारामती, जि. पुणे) असे अटक करण्यात आलेल्या आरोपीचे नाव आहे. त्याची रवानगी येरवडा केंद्रीय कारागृह येथे करण्यात आली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, रविवारी (ता. ०८) बारामती शहरातील शिवाजी चौक परिसरात फिर्यादीस मारहाण करून जबरदस्तीने रोख रक्कम काढून घेतल्याची घटना घडली होती. याप्रकरणी बारामती शहर पोलीस स्टेशन येथे गुन्हा भारतीय न्याय संहिता २०२३ कलम ३०९ (४) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता. सदर गुन्हा नोंद होताच शहर पोलिसांनी तात्काळ तपासाची चक्रे फिरवली. तांत्रिक विश्लेषण, स्थानिक माहिती आणि सखोल चौकशीच्या आधारे आरोपी सिद्धार्थ घाडगे याचा सक्रिय सहभाग असल्याचे निष्पन्न झाले. त्यानुसार आरोपीस ताब्यात घेऊन अटक करण्यात आली. अंगझडती दरम्यान गुन्ह्यातील रकमेपैकी काही रक्कम जप्त करण्यात आली आहे.

दरम्यान, आरोपीस न्यायालयासमोर हजर केले असता प्रथम पोलीस कोठडी मंजूर करण्यात आली. तपास पूर्ण झाल्यानंतर न्यायालयीन कोठडी सुनावण्यात आली असून त्याची रवानगी येरवडा केंद्रीय कारागृह येथे करण्यात आली आहे. ही कारवाई पोलीस अधीक्षक संदीप सिंग गिल, अपर पोलीस अधीक्षक गणेश बिरादार, उपविभागीय पोलीस अधिकारी सुदर्शन राठोड तसेच प्रभारी पोलीस निरीक्षक श्रीशैल चिवडशेट्टी यांच्या मार्गदर्शनाखाली तपास पथकातील पोलीस उपनिरीक्षक रत्नदीप भंडारे तसेच पोलीस हवालदार सुलतान डांगे, अमोल शिंदे, पोलीस शिपाई विशाल चौधर, सागर जामदार, विशाल शिंदे, अक्षय सिताफ, नेवसे यांनी केली.

# फुरसुंगी पोलिसांकडून बुलेट चोराला बेड्या




**फुरसुंगी, ता. १७ :** फुरसुंगी पोलीस ठाण्याच्या हद्दीत रात्रगस्त करत असलेल्या तपास पथकाने बुलेट मोटारसायकल चोरनाऱ्या एका चोरट्याला ताब्यात घेतले. बुधवारी (ता. ११) रात्री दोन वाजण्याच्या सुमरास हि कारवाई करण्यात आली आहे.

प्रकाश बाबुराव भालेराव (वय -३१, धंदा-ड्रायव्हर, रा. लवळे फाटा, पिरंगुट, ता. मुळशी, जि. पुणे) असे अटक करण्यात आलेल्या आरोपीचे नाव आहे. त्याच्याकडून दीड लाख रुपयांची बुलेट मोटारसायकल जप्त करण्यात आली आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, बुधवारी (ता. ११) रात्री तपास पथक प्रभारी पोलीस उप निरीक्षक विनोद पवार व त्यांचेसोबत पथकातील पोलीस अंमलदार फुरसुंगी पोलीस स्टेशनचे हद्दीत रात्रगस्त करत होते. दोन वाजण्याच्या सुमारास एक इसम बुलेट मोटारसायकल ढकलत घेवून जात असल्याचे दिसला, बुलेटला नंबरप्लेट नसल्याने तसेच त्याच्या हालचाली संशयास्पद वाटल्याने थांबवून चौकशी केली. परंतु त्याने उडवा उडवीची उत्तरे देवून माहिती देण्यास टाळाटाळ करू लागला.

संशयित इसमाने चौकशी करताना उडवा-उडवीची उत्तरे दिल्याने पोलीसांनी त्याला आणि मोटारसायकलला फुरसुंगी पोलीस स्टेशन येथे आणले. चासी नंबर तपासल्यावर मोटारसायकल एम एच १४ एफ के ४८७० या क्रमांकाची असून मालक आकाश सोनके असल्याचे स्पष्ट झाले.

तपासात आरोपी प्रकाश भालेराव काही दिवसापासून शिंदे वासुली येथील एस.पी. आर.एम.सी. स्टोन क्रेशर कंपनीत ड्रायव्हर म्हणून काम करत होता. त्याने आकाश सोनके यांची बुलेट चोरी केली असल्याची कबुली दिली. म्हाळुंगे एमआयडीसी पोलीस स्टेशनशी संपर्क साधल्यावर गुन्हा नोंद असल्याचे समजले आणि आरोपीला ताब्यात घेऊन मोटारसायकलसह पोलीस ठाण्यात नोंद केली.

वरील कामगिरी वरिष्ठांच्या मार्गदर्शनाखाली फुरसुंगी पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक अमोल मोरे, पोलीस निरीक्षक (गुन्हे) राजेश खांडे, यांचे सुचनेप्रमाणे तपास पथकातील पोलीस उपनिरीक्षक विनोद पवार, पोलीस हवालदार नितीन गायकवाड, सागर वणवे, हरिदास कदम, पोलीस अंमलदार हेमंत कामथे, अभिजित टिळेकर यांनी केली आहे.

# कॅबिनेट मंत्री नरहरी झिरवळांवर उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांची नाराजी



**मुंबई, ता. १७ :** राज्याच्या राजकारणात सध्या मोठी खळबळ उडाली आहे. दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या निधनानंतर त्यांच्या पत्नी सुनेत्रा पवार यांनी सत्तेची धुरा स्वीकारल्यानंतर आक्रमक शैलीत कारभार हाती घेतल्याचे दिसत आहे. मंत्रालयातील एका बैठकीत त्यांनी कॅबिनेट मंत्री नरहरी झिरवाळ यांची चांगलीच कानउघाडणी केल्याची चर्चा राजकीय वर्तुळात रंगली आहे.

अन्न व औषध प्रशासन मंत्री नरहरी झिरवाळ यांच्या मंत्रालयातील कार्यालयात दोन दिवसांपूर्वी लाचखोरीचा प्रकार उघडकीस आला. झिरवाळ यांच्या कार्यालयातील कर्मचारी राजेंद्र ढेरंग याला एका मेडिकल दुकानदाराकडून ३५ हजार रुपयांची लाच घेताना लाचलुचपत प्रतिबंधक विभाग यांनी रंगेहात पकडले. प्राथमिक तपासात मंत्र्यांच्या खाजगी सचिवाने लाच घेण्याचे निर्देश दिल्याची माहिती समोर आल्याने प्रकरण अधिकच गंभीर बनले आहे. या घटनेमुळे प्रशासनासह राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष यांची प्रतिमा मलिन झाल्याची भावना व्यक्त होत आहे. याच पार्श्वभूमीवर सुनेत्रा पवार यांनी झिरवाळ यांच्याकडे तीव्र नाराजी व्यक्त करत, स्वतःची आणि पक्षाची प्रतिमा जपा. तुमच्या कार्यालयातील कर्मचाऱ्यांच्या वागण्यामुळे सरकारची बदनामी होता कामा नये, अशा कडक शब्दांत सुनावल्याची माहिती सूत्रांनी दिली.

राज्यातील सत्ताकारणात आता सुनेत्रा पवार यांच्या आक्रमक आणि नियंत्रणात्मक भूमिकेची चर्चा रंगू लागली असून, आगामी काळात प्रशासनात शिस्तीचा धाक वाढणार का, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# आसावरी जगदाळे यांना शासकीय सेवेत सामावून घेण्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे आदेश



**पुणे, ता. १७ :** पहलगाम येथील दहशतवादी हल्ल्यात मृत्युमुखी पडलेले पुण्यातील संतोष जगदाळे यांची मुलगी आसावरी जगदाळे यांना सरकारी सेवेत सामावून घेण्याचे निर्देश उपमुख्यमंत्री आणि नगर विकासमंत्री एकनाथ शिंदे यांनी पुणे महानगरपालिका आयुक्तांना दिले आहेत.

जगदाळे यांच्या नियुक्तीची प्रक्रिया तातडीने सुरू करण्याच्या सूचनाही उपमुख्यमंत्री शिंदे यांनी महापालिका आयुक्त नवल किशोर राम यांना केल्या आहेत. त्यामुळे पुढील काही दिवसात आसावरी जगदाळे यांना महापालिकेच्या सेवेत रुजू होता येणार आहे. गेल्या वर्षी एप्रिल मध्ये पहलगाम येथे दहशतवादी संघटनेने केलेल्या गोळीबारात पुण्यातील संतोष जगदाळे यांचा मृत्यू झाला होता. हल्ला करताना दहशतवाद्यांनी धर्म विचारून गोळीबार केला होता.

पहलगाम हल्ल्यानंतर या हल्ल्यात मृत्युमुखी पडलेल्या नागरिकांच्या कुटुंबियांना आधार देण्यासाठी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी पुण्यात येऊन जगदाळे कुटुंबीयांची भेट घेतली होती. यावेळी त्यांनी संतोष जगदाळे यांच्या पत्नी प्रगती जगदाळे आणि आसावरी जगदाळे यांचे सांत्वन करून या कुटुंबाला आर्थिक आधार मिळावा, यासाठी आसावरीला शासकीय सेवेत सामावून घेण्याचे आश्वासन दिले होते.

राज्य सरकारने राज्य शासनाने नोकरीचे आश्वासन दिले होते. मात्र, नोकरीच्या प्रस्तावाला मंत्रालयातून अद्यापही मंजुरी नाही. मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्र्यांना भेटण्याचाही प्रयत्न केला. मात्र, भेट होऊ शकली नाही, अशी व्यथा दोन दिवसांपूर्वी पहलगाम येथील दहशतवादी हल्ल्यात मृत्यूमुखी पडलेल्या संतोष जगदाळे यांच्या कन्या आसावरी यांनी मांडली होती.

उपमुख्यमंत्री आणि राज्याचे नगर विकास मंत्री एकनाथ शिंदे यांनी पुणे महापालिका आयुक्त नवल किशोर राम यांच्याशी दूरध्वनीवरून संपर्क साधला. जगदाळे यांच्या कन्या आसावरी यांना बोलावून त्यांच्याशी चर्चा करून त्यांच्या शिक्षणाला समक्ष असे पद महापालिकेच्या सेवेत निर्माण करावे आणि तेथे त्यांना रुजू करून घ्यावे अशा सूचना उपमुख्यमंत्री शिंदे यांनी दिल्या.

**खासदार कुलकर्णी यांचा पाठपुरावा**

पहलगाम येथील दहशतवादी हल्ल्यात मृत्युमुखी पडलेल्या संतोष जगदाळे यांच्या कुटुंबाला न्याय द्यावा, जगदाळे यांची कन्या आसावरी यांना शासकीय नोकरीत रुजू करून घ्यावे, अशी मागणी काही दिवसांपूर्वी राज्यसभा खासदार प्रा. मेधा कुलकर्णी यांनी नुकतीच केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्याकडे केली. त्या पार्श्वभूमीवर आसावरी यांच्याशी संवाद साधला असता, त्या म्हणाल्या, महापालिकेत नोकरी देण्यासंदर्भातील प्रस्ताव महापालिका प्रशासनाकडून गेल्या वर्षी जुलै महिन्यात मंत्रालयात पाठविण्यात आला. मंत्रालयातून अद्यापही या प्रस्तावाला मंजुरी देण्यात आलेली नाही. या संदर्भात मंत्रालयाच्या स्तरावरही पाठपुरावा करण्यात आला असून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची भेट घेण्याचाही प्रयत्न करण्यात आल्याचे सांगण्यात आले होते.